# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
# कृषिविद्या विभाग, परभणी

जा.क्र कृवि/३९२/२०२१
दिनांक : ११/०५/२०२१

## जाहिर प्रगटन

या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, कृषिविद्या विभाग, वनामकृवि, परभणी मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता,वनामकृवि, परभणी यांचे मंजूरी क्र. १०२२०/२१ दि. २९/०१/२०२१ नुसार प्रक्षेत्रावरील गट क्र. ३४०/२, ३५१, ३५२ आणि ३५३ मधील असे एकूण ११ हेक्टर पडीक क्षेत्र असून सध्या सदरील क्षेत्रामध्ये बाभळीचे झुडपे असून स्वतःच्या जेसीबी मशीनद्वारे काढून नेण्यासाठी जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करावयाचे आहे. तरी इच्छूक व्यक्तिने दि.१९/०५/२०२१ रोजी ठिक सकाळी १० वाजता या कार्यालयास हजर रहावे.

### जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :

१. सदरील जमिनीवरील बाभळीचे लहान झुडपे प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर पाहावयास मिळतील.
२. लिलावात भाग घेणा-या/बोली बोलणा-या प्रत्येक व्यक्तिस रु. १,०००/- अनामत रक्कम जमा करावी लागेल. अनामत रक्कम जमा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. सदर अनामत रक्कम लिलाव संपल्यानंतर परत केली जाईल.
३. बोलीची किंमत कमी आहे असे वाटल्यास सदर बाभळीचे झुडपे यांचा फेर लिलाव करण्यात येईल किंवा अपेक्षेप्रमाणे न आल्यास सदरील बाभळीचे झुडपांचा लिलाव रद्द करणे इ. अधिकार संबंधीत लिलाव अधिकारी अथवा कमिटीस राहतील. या शिवाय लिलाव अधिका-याचा/ कमिटीचा निर्णय बंधनकारक राहील.
४. उच्चत्तम बोली बोलणा-यासच सदर बाभळीचे झुडपे विकल्या जातील.
५. खरेदी करणा-यांनी खरेदीची रक्कम त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करुन रितसर पावती हस्तगत करणे आवश्यक आहे.
६. संपुर्ण रक्कम जमा केल्याशिवाय सदर बाभळीचे झुडपे घेऊन जाता येणार नाहीत.
७. खरेदी करणा-या व्यक्तिच खरेदी केलेल्या बाभळीचे झुडपे नेल्यानंतर परिसर स्वच्छ करुन दयावयाचा आहे.
८. खरेदी केलेली बाभळीचे झुडपे स्वतःच्या जेसीबीद्वारे काढून प्रक्षेत्रावरुन न्यावी लागतील नसता योग्यती कार्यवाही करण्यात येईल.
९. लिलाव प्रक्रियेसंबंधी लिलाव समितीच्या अध्यक्षांचा निर्णय अंतिम ग्राहय धरण्यात येईल. लिलाव प्रक्रियेत भाग घेणा-यांनी याची नोंद घ्यावी.

विभागप्रमुख
कृषिविद्या विभाग
व.ना.म.कृ.वि., परभणी

प्रत :१. मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता, व.ना.म.कृ.वि., परभणी यांना माहितीस्तव सादर.
२. प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, व.ना.म.कृ.वि., परभणी यांच्या कार्यालयास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संकेत स्तरावर प्रसारणासाठी.
३. मा संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता, व.ना.म.कृ.वि., परभणी यांच्या कार्यालयाचा नोटीस बोर्डवर.
४. कृषिविद्या विभाग, व.ना.म.कृ.वि., परभणी यांच्या कार्यालयाचा नोटीस बोर्डवर.
५. कृषि महाविद्यालय, व.ना.म.कृ.वि., परभणी यांच्या कार्यालयाचा नोटीस बोर्डवर.